# सार्वजनिक सूचना

महाराष्ट्र शासनाने दिनांक १० जानेवारी, २०१३ रोजीच्या अधिसूचना क्रमांक टीपीएस-१७१२/४७५/प्र.क्र.-९८/१२/नवि-१२ अन्वये शहर आणि औद्योगिक विकास महामंडळ महाराष्ट्र मर्यादित (सिडको) याची महाराष्ट्र प्रादेशिक आणि नगररचना अधिनियम १९६६, च्या कलम ४० च्या उपकलम (१) मधील खंड (ब) नुसार नवी मुंबई विमानतळ प्रभावित अधिसूचित क्षेत्र (नैना), क्षेत्रासाठी विशेष नियोजन प्राधिकरण म्हणून नेमणूक केली आहे.

सिडकोने दि. ०७ नोव्हेंबर, २०१६ रोजीच्या असाधारण महाराष्ट्र शासन राजपत्रात नैना मधील २०१ गावांसाठी, महाराष्ट्र प्रादेशिक आणि नगररचना अधिनियम १९६६, च्या कलम २६ च्या उपकलम (१) अन्वये 'प्रारुप विकास योजना' तयार करण्यात येवून प्रसिध्द केलेली आहे. ज्यामध्ये यावर तीस दिवसांच्या कालावधीत (म्हणजेच ०६ डिसेंबर, २०१६ पर्यंत) जनतेकडून हरकती व सूचना मागविण्यात आल्या होत्या. प्रसिध्द सुचनेच्या प्रतिसादार्थ सिडकोला ५४८ हरकती व सुचना प्राप्त झाल्या आहेत.

हरकती व सुचना दाखल केलेल्या व्यक्तींना बाजू मांडण्याची संधी देण्यासाठी व त्यावर विचार करण्यासाठी नियोजन समिती गठीत करण्यात आलेली आहे.

सदर सुचना व हरकतींची प्रथम सुनावणी दि. १५.०३.२०१७, बुधवार व १६.०३.२०१७ गुरुवार, रोजी नैना कार्यालय, ८ वा मजला, टॉवर क्र. १०, बेलापूर रेल्वे स्थानक संकुल, सीबीडी, बेलापूर, नवी मुंबई ४००६१४, येथे आयोजित करण्यात आली आहे. उर्वरित अर्जदारांची सुनावणी त्यानंतर आयोजित करण्यात आलेली आहे.

सदर सुनावणीविषयी माहिती देणारे सूचना-पत्र नोंदणीकृत टपालाने (RPAD) हरकती व सुचना दाखल केलेल्या ५४८ अर्जदारांना पाठविण्यात आलेले आहे. दि. १५.०३.२०१७, बुधवार व १६.०३.२०१७ गुरुवार रोजीच्या सुनावणीचे तपशील आणि सुनावणीसाठी बोलविण्यात आलेल्या अर्जदारांची यादी पुढील संकेतस्थळावर उपलब्ध आहे. "http://cidco.maharashtra.gov.in/pdf/Hearing_Note.pdf". सुनावणीसाठी बोलविण्यात आलेल्या जनतेला विनंती करण्यात येते की, सुनावणीला येते वेळी त्यांना पाठविण्यात आलेले सूचना पत्र सोबत आणावे. ज्या अर्जदारांना सूचना पत्र मिळालेले नसेल त्यांनी कृपया दाखल केलेल्या हरकती व सूचना अर्जाची मूळ प्रत सोबत आणावी.

नगर रचना अधिकारी (नैना)

शहर व औद्योगिक विकास महामंडळ मर्या.